# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच, कोल्हापूर


दूरध्वनी . : ०२३१-२६६६००१, २६६६००२
फॅक्स क्र. : ०२३१- २६६६००१
**E-mail : cgrfkolhapur@mahadiscom.in**

महावितरण

कोल्हापूर परिमंडल,
विद्युत भवन", २रा मजला,
ताराबाई पार्क, कोल्हापूर- ४१६ ००३.


संदर्भ क्रमांक : काअ//ग्रातनिमं/ केस क्र.८९/२०१४-१५/४५ दिनांक : ९/०७/२०१५

**आदेश केस क्रमांक ८९/१४-१५**

१) श्री. महादेव बाबू उदाळे
मु. उदाळवाडी, पो. वाघवे, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर अर्जदार

**विरुध्द**

१) कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफिसर,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कपंनी मर्यादित,
मंडल कार्यालय, कोल्हापूर
२) कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कपंनी मर्यादित,
विभागीय कार्यालय, ग्रा.वि.१ कोल्हापूर पक्षकार

कोरम :- १) श्री. डी. एस. कांबळे, सदस्य सचिव
२) श्री. पी.एस. बुरांडे, सदस्य

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

**न्याय निर्णय**

श्री. डी. एस. कांबळे, सदस्य, सचिव, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालीलप्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

तक्रारीचे स्वरुप :-

श्री. महादेव बाबू उदाळे मु.उदाळवाडी,पोस्ट वाघवे, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर-४१६००१ दूरध्वनी क्र. ९०९६३६१८२८/९४२११११८२८ यांनी मंचाकडे नवीन कनेक्शन न मिळालेबद्दल दि. १९.३.२०१५ रोजी अ फॉर्ममध्ये रितसर अर्ज दाखल केला. यापूर्वी त्यांनी मौ. उदाळवाडी येथील गट नं. १०५२ मधील विहीरीवर शेतीपंपासाठी ५ अश्वशक्ती मंजूर भाराचे वीज कनेक्शन मिळणेसाठी १०.१२.२०१४ रोजी अर्ज केला होता. यावर महावितरणने दि.१८.१२.२०१४ रोजीच्या पत्रान्वये सर्व सहहिस्सेदारांचे संमतीपत्र सादर करण्यास सांगितले. श्री. उदाळे यांनी सदर विहीरीमध्ये आपला हक्क असलेचा गांवकामगार तलाठी यांचा दाखला , स्वत:चा ७/१२ उतारा आणि संबंधित पाणी पुरवठा संस्थेचा दाखला जोडला होता. तथापि संबंधित महावितरण कार्यालय पन्हाळा उपविभाग यांनी श्री. उदाळे यांचे प्रकरण मंजूर केले नाही. सबब श्री. उदाळे यांनी अंतर्गत कक्ष कोल्हापूर येथे क्ष फॉर्ममध्ये तक्रार दाखल केली. यावर

अंतर्गत कक्ष कोल्हापूर यांनी ७/१२ उता-यावर तक्रारदाराचे नांव आहे, विहीरीमध्ये तक्रारदार यांचा हिस्सा असलेले गांवकामगार तलाठी यांचा दाखला आहे त्यामुळे तक्रारदार यांना वीज कनेक्शन देण्यास सहहिस्सेदार यांच्या पत्राची आवश्यकता नाही असे मत नोंदविले. तथापि कांही वाद उत्पन्न झालेस तक्रारदार जबाबदार राहतील असे प्रतिज्ञापत्र सादर करावे असा आदेश दिला.

२) ग्राहकाची मंचाकडे मागणी /अपेक्षित मदत :-

यावर तक्रारदार ग्राहकानी अ फॉर्ममध्ये तक्रार दाखल करुन मंचाकडून वितरण कंपनीस ग्राहकाकडून प्रतिज्ञापत्र न घेता कनेक्शनसाठी पैसे भरुन घेणेचा व शेतीपंपासाठी त्वरीत वीज जोडणी देणेचा आदेश द्यावा अशी विनंती केली.

वरील विवेचनावरुन खालील मुद्दा निर्णयासाठी उपस्थित होतो.

प्रश्न :- तक्रारदाराने मागणी केल्याप्रमाणे अर्ज मंजूर करणे योग्य होईल काय?

उत्तर :- होय

कारणमीमांसा -

सदर तक्रारीची सुनावणी तक्रार क्रमांक ८९/१४-१५ अंतर्गत दि. २५.६.२०१५ रोजी ग्राहक तक्रार निवारण मंच ताराबाई पार्क, कोल्हापूर येथे ठेवण्यात आली होती. तक्रारदार यांचे वतीने प्रतिनिधी म्हणून श्री. दादासो महादेव उदाळे उपस्थित होते. वितरण कंपनीतर्फे श्री. आर.डी. कु-हाडे , स.अ. पन्हाळा आणि श्री. एस.एस. आरळी, उपकार्यकारी अभियंता हे उपस्थित होते. चर्चेदरम्यान ग्राहक श्री. उदाळे यांनी अंतर्गत कक्षाचे निर्णयानुसार ८.५.२०१५ रोजीच पन्हाळा येथे महावितरण कार्यालयात प्रतिज्ञापत्र सादर केल्याचे सांगितले. यावर त्यांना अद्याप कोटेशन का दिले नाही असे मंचातर्फे विचारले असता, दि.२२.६.२०१५ रोजी पोस्टाने श्री. उदाळे यांना कोटेशन पाठविले असल्याचे संबंधित अधिकारी यांनी सांगितले. दि. ८.५.२०१५ ते २२.६.२०१५ एवढा विलंब कोटेशन देण्यास का लावला असे विचारुन मंचाने नाराजी व्यक्त केली आणि मंचासमक्षच ग्राहक श्री. उदाळे यांना कोटेशनची प्रत देणेत आली.

## आदेश

१) ग्राहकाची तक्रार मंजूर करण्यात येत आहे. ग्राहकाने कोटेशनची रक्कम भरल्यानंतर नियमानुसार त्वरीत विद्युत पुरवठा करणेत यावा.

२) या निर्णयाविरुध्द तक्रार यांना अपील करावयाचे असल्यास त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसाचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व) मुंबई याजकडे करता येईल.

**(डी. एस. कांबळे)**
**सदस्य सचिव**

अध्यक्षपद दि. १६.१२.२०१४ पासून रिक्त.

पी.एस. बुरांडे,
सदस्य
एकमताच्या/बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करणेत यावी.